**पीएम एकता मॉलचे (Unity Mall) कार्यान्वयन, व्यवस्थापन व देखभाल संदर्भात.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
**शासन निर्णय क्र. : संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१३९/उद्योग-६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० मे, २०२६

**वाचा :** १. व्यय विभाग, वित्त मंत्रालय, भारत सरकारचे पत्र क्र.४४(१)/PF-S/२०२३-२४ (CAPEX)(Pt.) Dated १६/०६/२०२३.
२. नगर विकास विभागाचे पत्र क्र.सोआडी-३३२५/संक्र.२११०/नवी-१० दि.२४/११/२०२५.

**प्रस्तावना :** केंद्र शासनाच्या "राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना २०२३-२४" अंतर्गत प्रत्येक राज्यांमध्ये "पीएम एकता" (Unity Mall) बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचना व मा.मुख्य सचिव महादेयांकडील यांचेकडील बैठकीतील सुचनांनुसार सदर युनिटी मॉल सिडको महामंडळाकडून बांधण्यात येत आहे. प्रत्येक राज्य / केंद्रशासित प्रदेशासाठी एक व राज्यातील प्रत्येक जिल्हयांसाठी एक स्टॉल प्रस्तावित असून युनिटी मॉलचे बांधकाम दि.१५ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे. पीएम एकता मॉलचे (Unity Mall) कार्यान्वयन, व्यवस्थापन व देखभालीसंदर्भात मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.२७ नोव्हेंबर, २०२५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये "पीएम एकता" (Unity Mall) च्या कार्यान्वयन, व्यवस्थापन व देखभालीसंदर्भात कार्यपध्दती ठरविण्यासाठी दिलेल्या निर्देशास अनुसरुन समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती

**शासन निर्णय :-**

पीएम एकता मॉलचे कार्यान्वयन, व्यवस्थापन व देखभाल सुरळीतपणे सुरु राहण्यासाठी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ यांची समन्वयन अधिकारी (Nodal Officer) म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

पीएम एकता मॉलचे सिडको महामंडळाकडून विहीत पध्दतीने उद्योग विभागाकडे हस्तांतरण स्विकारण्यासाठी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ यांनी पीएम एकता मॉलसाठी विद्युत जोडणी व अन्य अनुषंगिक बाबींकरीता आवश्यक कार्यवाही करावी.

पीएम एकता मॉलचे कार्यान्वयन, व्यवस्थापन व देखभाल या बाबींसाठी विहीत कार्यपध्दती निश्चित करण्याकरीता विकास आयुक्त (उद्योग) यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय | अध्यक्ष |
| २. | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ | सदस्य |
| ३. | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ | सदस्य |
| ४. | अतिरिक्त विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय | सदस्य |
| ५. | सह व्यवस्थापकीय संचालक, सिडको | सदस्य |
| ६. | उद्योग सहसंचालक(ODOP), उद्योग संचालनालय, मुंबई | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा :** १) पीएम एकता मॉलचे कार्यान्वयन, व्यवस्थापन व देखभालीसंदर्भात धोरण ठरविणे आणि अंमलबजावणीची कार्यपद्धती निश्चित करणे.

२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार पीएम एकता मॉलचे कार्यान्वयन, व्यवस्थापन व देखभालीसाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी मॉडेल (PPP) कार्यपद्धतीचा अवलंब करावा.

**कालावधी :** ३० जून, २०२६ पर्यंत.

पीएम एकता मॉलमधील जिल्ह्यांना वाटप करावयाच्या स्टॉल्स कोणाला वाटप करावे याबाबत निर्णय घेण्यासाठी संबंधीत जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ३. | जिल्हा समन्वय अधिकारी, महिला आर्थिक विकास महामंडळ | सदस्य |
| ४. | जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने अन्य विभागाचे अधिकारी | सदस्य |
| ५. | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा :** पीएम एकता मॉलमध्ये जिल्ह्याला वाटप करण्यात आलेल्या स्टॉलमध्ये प्रदर्शित करण्यासाठी जिल्ह्यातील उत्पादन आणि उत्पादकाची निवड करणे.

**कालावधी :** ३० जून, २०२६ पर्यंत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०२६०५२०१७१५०३०९१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

LAXMIKANT GOPALRAO DHOKE

Digitally signed by LAXMIKANT GOPALRAO DHOKE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELD, 2.5.4.20=413BEECA50B65438C7A037917CCF1F24D8CA684B65640DF6372EA731FFAC4DFC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E714BBCD4D43C6782884C7E7A2091F9F1EDC1D97EBB542C48B98FB8C8BDD6CF4, cn=LAXMIKANT GOPALRAO DHOKE
Date: 2026.05.20 17:16:12 +05'30'

**(लक्ष्मीकांत ढोके)**
**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांचे प्रधान सचिव.
३. मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांचे खाजगी सचिव.
४. मा.मंत्री / मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांचे खाजगी सचिव.
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांचे वरीष्ठ स्विय सहायक.
६. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.
७. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई.
८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्या., मुंबई.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई.
१०. अतिरिक्त विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.
११. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य, यांचे स्विय सहायक.
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांचे स्विय सहायक.
१३. उद्योग सहसंचालक(ODOP), उद्योग संचालनालय, मुंबई.
१४. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सर्व जिल्हे, महाराष्ट्र राज्य.
१५. जिल्हा समन्वय अधिकारी, महिला आर्थिक विकास महामंडळ, सर्व जिल्हे, महाराष्ट्र राज्य.
१६. कार्यासन संग्रहार्थ (उद्योग-६).